# N 322

Seat No. [ ] [ ] [ ] [ ] [ ] [ ] [ ]

Available on:Https://School2you.blogspot.com

2020 III 64 [illegible] - N 322 - MARATHI (COMPOSITE) (A) (SECOND OR THIRD LANGUAGE) (M)

**Time : 2 Hours** **(Pages 11)** **Max. Marks : 40**

---

**कृतिपत्रिकेसाठी सूचना :—**

(1) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.

(2) आकृत्या पेननेच काढाव्यात.

(3) उपयोजित लेखनातील प्रश्नांसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.


(4) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन याकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

## विभाग-1 : गद्य

1\. (अ) **उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

(1) **आकृती पूर्ण करा :**

(*i*) 2




P.T.O.

(*ii*) लेखिका कागद-पेन म्हणून वापरत असणारी वनस्पती → [ ] 1

शाळेची घंटा झाली, की सर्व मुले-मुली जेवायला बसत. मी त्यांच्या तोंडाकडे बघत बसे. पोटात भूक लागलेली असे. मुले-मुली जेवण करून खेळायला गेल्या, की मी\लाडूचा तुकडा, भुरका, गुळाचा खडा, जिलेबीचा तुकडा\मातीतून फुलात उचलून ठेवत असे. सर्वांना वाटायचं, मी चाफ्याची फुलंच गोळा करते; पण त्या फुलातला माती लागलेला तो अन्नाचा कण चाफ्याच्या सुगंधाने चवदार व गोड लागायचा. त्यावर घोटभर पाणी पिऊन मी वर्गात बसायची. आमच्या चिखलदऱ्यात भराडी नावाची एक वनस्पती येते. चांगलं तळहाताएवढं मोठं पान असतं. त्याला खाली एक काटा असतो. त्या भराडीचा काटा हे माझं पेन व भराडीचं पान हा माझा कागद असे. म्हशीमागे जात जात अ, आ, इ, ई, उ, ऊ अशी अक्षरं लिहिणं मी शिकू लागले. असं निंसर्गाच्या सोबतीनं लिहिलं, म्हणून शिकलेलं कधीच विसरता नाही आलं.

(2) **स्वमत :** 3

सिंधुताईंना शिकण्याची खूप तळमळ होती, हे तुमच्या शब्दांत पटवून द्या.

**(आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

(1) **आकृती पूर्ण करा :** 2

राजेपदासाठी सरकारकडे पाठवण्यात आलेल्या पक्ष्यांची नावे

[ ] [ ] [ ] [ ]


Available on:Https://School2you.blogspot.com

Available on:Https://School2you.blogspot.com

Available on:Https://School2you.blogspot.com



(2) आकृती पूर्ण करा : 2





वन्य पशुपक्षी ही आपली राष्ट्रीय संपत्ती आहे, तिच्या रक्षणाकडे आम जनतेचे लक्ष वेधावे. यासाठी सरकारने प्रत्येक राज्याचे अभिप्राय मागवले. वृत्तपत्रांतून अभिप्राय मागवण्यात आले आणि अशा रीतीने अनेक पक्ष्यांची नावे राजेपदासाठी सरकारकडे पाठवण्यात आली. त्यात गरुड, हंस, महासारंग आदी पक्ष्यांचीही नावे होती. अनेक पक्ष्यांच्या नावांतून एक नाव निवडण्यासाठी अनेक कसोट्या लावण्यात आल्या. त्या सर्व कसोट्यांत मोर उत्तीर्ण झाला आणि 'राष्ट्रीय पक्षी' म्हणून त्याची निवड करण्यात आली. या कसोट्या लावताना ऐतिहासिक प्रणाली, काव्याची पार्श्वभूमी, लोकांची आवड इत्यादी बाह्य कारणांबरोबरच रंग, शरीरसौष्ठव, कलात्मकता, कंठस्वर आदी पक्षी वैशिष्ट्यांचाही विचार करण्यात आला आणि त्यात 'राष्ट्रीय पक्षी' हा मानाचा किताब देण्यास 'मोर' हाच पक्षी योग्य आहे, असे ठरवण्यात आले.

Https://School2you.blogspot.com

Available on:Https://School2you.blogspot.com



(3) **आकृतिबंध पूर्ण करा :** 2




## विभाग-2 : पद्य

2. (अ) **कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

(1) **उत्तरे लिहा :** 2

(*i*) नारळाच्या आतमध्ये असणारे ..................................

(*ii*) अभंगात उल्लेखलेली फुले व फळे ......................., .......................

केकतीला कांट्याचे वेढे।
भितरीं निपजती केवडे।
तैसें साधूचे शब्द गाढे।
परोपकारालागीं॥

फणस सर्वांगीं कांटवले।
भितरीं महा गोडीनें कोंदले।
तैसें साधुहृदय जालें।
बोधासंगें परियेसा॥

Available on:Https://School2you.blogspot.com

नारळ कठीण दिसे बाहेर।
भितरीं खोबरें अरुवार।
तैसें साधूचें अंतर।
बोधें वोसंडले॥

ऐसा सद्‌गुरुशीं धरा भाव।
तो कैसा करावा उपाव।
शेखमहंमद सांगती सेव।
सभे श्रोत्यांप्रती॥

(2) दिलेल्या पंक्तीचा सरळ अर्थ लिहा : 2

केकतीला कांट्याचे वेढे।
भितरीं निपजती केवडे।
तैसें साधूचें शब्द गाढे।
परोपकारालागीं॥

(आ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा : 2

(1) उत्तरे लिहा :

(*i*) कवीने जपायला सांगितलेली गोष्ट – ..............................

(*ii*) सर्वदूर ललकारी देण्यासाठी वापरावयाचे साधन – ....................

P.T.O.

Available on:Https://School2you.blogspot.com

Available on:Https://School2you.blogspot.com

हा देश माझा याचे, भान जरासे राहू द्या रे ॥धृ॥

हा उंच हिमालय माझा, हा विशाल सागर माझा
ह्या गंगा, यमुना, शेती, धरती, बागबगीचा माझा
अभिलाषा यांची धरिता, कुणी नजर वाकडी करता
या मरण द्यावया, स्फुरण आपल्या बाहू पावू द्या रे ॥१॥

जे हात उत्सुकलेले, दगडांच्या वर्षावाला
रोखा ते, लावा कार्याला, या देशाच्या प्रगतीला
हे बंद करा उत्पात, थांबवा आपुला घात
सामर्थ्य न जावो व्यर्थ, काहिसा अर्थही येऊ द्या रे ॥२॥

जरी अनेक अपुले धर्म, जरी अनेक अपुल्या जाती
परी अभंग असू द्या, सदैव अपुली माणसुकीची नाती
द्या सर्व दूर ललकारी, फुंकारे एक तुतारी
संदेश रोष जे, द्वेष मनातील वाहून जाऊ द्या रे ॥३॥

Available on:Https://School2you.blogspot.com

(2) **दिलेल्या पंक्तीचा सरळ अर्थ लिहा :** 2

जे हात उत्सुकलेले, दगडांच्या वर्षावाला
रोखा ते, लावा कार्याला, या देशाच्या प्रगतीला.

## विभाग-3 : भाषाभ्यास

Available on:Https://School2you.blogspot.com

3\. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती :

(1) पुढील वाक्यांचा काळ ओळखून लिहा : 2

(*i*) अरमानने दुसरे पेन घेऊन काम सुरू केले.

(*ii*) झाडांवर फुले हसू लागतील.

(2) वाक्प्रचार : 2

खालील वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यांच्या योग्य जोड्या जुळवा :

| वाक्प्रचार | वाक्प्रचाराचे अर्थ |
|---|---|
| (*i*) गाऱ्हाणी सांगणे | गर्जना करणे |
| (*ii*) भांबावून जाणे | तक्रारी करणे |
| | गोंधळून जाणे |

(आ) शब्दसंपत्ती :

(1) समानार्थी शब्द लिहा : 1

(*i*) रात्र

(*ii*) निद्रा

(2) पुढील शब्दातील अक्षरांपासून **दोन** अर्थपूर्ण शब्द तयार करा : 1

वजनदार

(इ) अचूक शब्द ओळखून लिहा : 1

सौदर्य/सौंदर्य/सौंर्दय/संवदर्य.

Available on:Https://School2you.blogspot.com

(इ) पुढील विरामचिन्हांची नावे लिहा : 1

| | विरामचिन्हे | विरामचिन्हांची नावे |
|---|---|---|
| (i) | ? | |
| (ii) | . | |

## विभाग-4 : उपयोजित लेखन

4. (अ) पत्रलेखन : 4

**खूशखबर ! खूशखबर ! खूशखबर !**

नित्यानंद हायस्कूल
सुदर्शन नगर, औरंगाबाद

चला मुंबईला

कालावधी :
25 डिसेंबर ते 30 डिसेंबर

नाव नोंदणी :
1 डिसेंबर ते 5 डिसेंबर

शुल्क : प्रत्येकी ₹ 1000/-

सहल प्रमुख :
राजेश पाटील

संपर्क – nityahighschool002@gmail.com

Available on:Https://School2you.blogspot.com

यश/रेश्मा गोरे–मुलगा/मुलगी या नात्याने सहलीला जाण्यासाठी परवानगी मागणारे पत्र वडिलांना लिहा.

←**किंवा**→

यश/रेश्मा गोरे– विद्यार्थी या नात्याने सहल प्रमुखांना सहलीसाठी आपले नाव नोंदणी करणेबाबत विनंती करणारे पत्र लिहा.

Available on:Https://School2you.blogspot.com

(आ) **खालीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा :** 4

(1) ! खालील उतारा वाचून त्यावर **चार** प्रश्न असे तयार करा की ज्यांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात येतील :

निसर्गातील प्रत्येक दृश्य माणसाच्या मनाला आनंदित करणारे आहे. सूर्यास्ताच्या वेळी आकाशात अवर्णनीय शोभा दिसते. सूर्यबिंब लालभडक झालेले असते आणि मेघांच्या पटलावर संध्यारागाच्या अनंत छटा पसरलेल्या असतात. किलबिलाट करीत घरट्याकडे पक्षी परतत असतात. सकाळी भिन्न भिन्न मार्गांनी उडालेले हे पक्षी संध्याकाळी मात्र गटागटाने घरट्याकडे येतात. रानावनात चरावयास गेलेली गुरेढोरे सुद्धा आतुरतेने घराकडे येत असतात.

त्यांच्या गळ्यातील घंटानाद कानाला तृप्त करतो. त्याचवेळी त्यांच्या पावलांनी उडालेली धूळ वातावरणातील लाल रंगात मिसळते आणि वातावरणाला पवित्र करते. मंदमंद वाऱ्याच्या झुळका झाडे-वेलींना हिंदळवतात. हळूहळू काळोखाची मखमल धरती पांघरते आणि सारे विश्व विश्रांतीत रममाण होते.

Available on:Https://School2you.blogspot.com

(2) **जाहिरात :**

'गिरीभ्रमण टूर्स' यांचेतर्फे 'राष्ट्रीय उद्यानातील जंगल भ्रमंती' या सहलीसाठी जाहिरात तयार करा.

(3) **बातमी :**

खालील विषयावर बातमी तयार करा :

'शहरात डेंग्यूचा वाढता फैलाव, आरोग्य विभागाकडून उपाय योजना.'


(4) **कथालेखन :**

खालील शब्दांच्या आधारे कथालेखन करा :

वृद्ध शेतकरी – आंब्याचे रोप – नातवाचा प्रश्न – शेतकऱ्याचे उत्तर – नातवास शिकवण –

(इ) खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंधलेखन करा : 4


(1) **वर्णनात्मक :**



Available on:Https://School2you.blogspot.com

(2) **आत्मकथन :**

खालील घटक (फूल) तुमच्याशी बोलत आहे अशी कल्पना करून फुलाचे आत्मकथन लिहा :




This Copy.....
Available on:Https://School2you.blogspot.com

Answer Key :
School2you YouTube channel